परळी **संघर्षनेता**

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्ष- 11 वे | अंक क्र 61 | रविवार दि. 15 मार्च 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060




# चांदापूर येथे प्रतीशिर्डी श्री. साईबाबामुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण अनावरण सोहळ्याचे आज आयोजन!

## चांदापूर येथे मंत्री संजय सिरसाट, आ. धनंजय मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत

कै.केशवराव बाबाजी गित्ते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचा अनावरण सोहळा

## आज प्रति शिर्डी श्री.साईबाबामुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन

● भव्य दिव्य सोहळ्यास पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- रामराव गित्ते, रवींद्र (पापा) गित्ते, भरत गित्ते व ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर



परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) :- परळी वैद्यनाथ नगरीत उभारण्यात आलेल्या भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिराच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले तसेच श्री साईबाबा मंदिर परिसरात स्व. केशवराव बाबाजी गिते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळाचे आयोजित करण्यात आले आहे.तरी परळी वैजनाथ तालुक्यातील व पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रामराव केशवराव गिते, रविंद्र (पप्पा) केशवराव गिते, भरत केशवराव गिते तसेच ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी केले आहे.

चांदापूर येथे श्री. साईबाबामुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण अनावरण सोहळ्याचे रविवारी दि. 15 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजयजी सिरसाट यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कृषी मंत्री आ.धनंजय पंडितराव मुंडे हे राहणार आहेत. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. खा. भागवत कराड (मा.राज्यमंत्री, अर्थ मंत्रालय, भारत सरकार), समीर राजुरकर (महापौर, छत्रपती संभाजीनगर), प्रा. टी. पी. मुंडे सर (संपर्क प्रमुख, शिवसेना बीड), दिनेश कारागल (जैन), अनिल जगताप, सचिन मुळूक, मा. सौ. पद्मश्री बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी व परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र (पप्पा) गिते-मुंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे दुपारी 1 ते 2 या वेळेत कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. पुतळ्याचे अनावरण दुपारी 12.45 वाजता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



परळी वैजनाथ तालुक्यातील चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य दिव्य प्रति शिर्डी मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साईबाबा मंदिर साकारण्यात आले आहे. परळी वैद्यनाथ नगरीत श्री साईबाबांच्या पावन मूर्तीचे "ओम साईराम... ओम साईराम..." या जयघोषाने संपूर्ण वैद्यनाथ नगरी दुमदुमून गेली. श्री साईबाबांच्या मूर्तीचे शहरातील प्रमुख मार्गावरून शोभायात्रा व नगर प्रदीक्षणा काढून मूर्तीचे भक्तिमय वातावरणात भव्य आगमन झाले.

परळी वैद्यनाथ शहरापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीपासून काही अंतरावर निसर्गाचे वरदान लाभलेल्या परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे चांदापूर येथे आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर परिसरात गित्ते परिवाराच्या वतीने भव्य श्री साईबाबा मंदिर साकारण्यात येत आहे. या मंदिरासाठी जयपूर येथील सुप्रसिद्ध मूर्तीकार पांडे यांच्याकडून अत्यंत देखणी, मनमोहक व आकर्षक संगमरवरी श्री साईबाबांची मूर्ती साकारण्यात आली आहे. येत्या 15 मार्च रोजी या मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार असून पंचक्रोशीतील भाविकांना 'श्रद्धा आणि पान 3 वर



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान टप्पा क्र - 1 - महसुल मंडळ तेलगाव येथे संपन्न



धारूर ( बाबुराव तिडके ) जनतेचे प्रश्न जागच्या जागी सोडविण्यासाठी राज्य सरकारने प्रत्येक महसुल मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान चालू केलेले असुन जनतेचा देखिल या अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत आहे या अभियानाचा पहिला टप्पा महसुल मंडळ तेलगाव येथे पार पडला असता माजलगाव मतदार संघाचे आमदार श्री प्रकाश ( दादा ) सोळंके तहसिलदार श्री श्रीकृष्ण निळे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री लोखंडे साहेब व सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी कर्मचारी उपस्थित होते या महाराजस्व समाधान अभियानाला धारूर तालुक्या सह महसुल मंडळ तेलगाव विभागातील नागरीकांनी आपले शासकिय कामे करण्यासाठी मोठी गर्दी केली होती आमदार श्री सोळंके साहेब व महसुल मंडळ किल्ले धारूर यांनी संयुक्त रित्य अनेक नागरिकांच्या समस्यांचे निराकरण जागच्या जागीच केले असल्याने राज्य सरकारने सुरु केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिक आपले कामे करून घेत असल्याने हे अभियान यशस्वी होताना दिसत आहे

# चिमुकल्याची जिद्द मोठी! अंबाजोगाईत 6 वर्षांच्या अधियानचा कडक उन्हात ‘रोजा’; कौतुकाचा वर्षाव!



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी पवित्र रमजान महिना म्हणजे संयम, त्याग आणि अढळ श्रद्धेचा काळ. या महिन्यात कडक उपवास (रोजा) पाळणे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते, मात्र अंबाजोगाई येथील एका सहा वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या कृतीतून ‘भक्तीला वयाचे बंधन नसते’ हे सिद्ध करून दाखवले आहे. अधियान करीम शेख असे या चिमुकल्याचे नाव असून, कडक उन्हाची तमा न बाळगता त्याने पूर्ण दिवस रोजा ठेवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.भक्ती आणि संयमाचा अनोखा संगमसध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाही, अधियानने पहाटेपासून ते सूर्यास्तापर्यंत अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता आपला रोजा पूर्ण केला. इतक्या लहान वयात दाखवलेली ही चिकाटी आणि धार्मिक ओढ पाहून परिसरातील नागरिक थक्क झाले आहेत.परिसरात चर्चेचा विषय

अधियानच्या या निर्णयाचे आणि जिद्दीचे संपूर्ण अंबाजोगाई परिसरात कौतुक होत आहे. या चिमुकल्याचे ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे दिसून आली:प्रखर उन्हातही उत्साह: दिवसभर तापमान वाढलेले असतानाही अधियानच्या उत्साहात कोणतीही कमतरता नव्हती.धार्मिक संस्कार: रमजान महिन्याचे महत्त्व ओळखून त्याने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती.

कुटुंबीयांचे प्रोत्साहन: अधियानच्या या श्रद्धेचा सन्मान करत त्याच्या कुटुंबीयांनी त्याला पूर्ण पाठिंबा दिला."आमच्या मुलाने इतक्या लहान वयात इतक्या श्रद्धेने रोजा पूर्ण केला, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्याच्या या कृतीतून संयमाचे महत्त्व अधोरेखित होते," अशी भावना त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.प्रेरणादायी आदर्शरमजान महिना हा आत्मसंयम आणि परोपकार शिकवणारा महिना आहे. अधियानने दाखवलेली ही शिस्त आणि भक्ती आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष भेटीगाठींमधून अधियानवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली जात आहे.

# भास जीवन जगण्याचा

## बंजारा दिलीप लालू महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर

कधी कधी आयुष्य आपल्याला एक सुंदर स्वप्न दाखवतं. त्या स्वप्नात एक चेहरा असतो, एक आवाज असतो, आणि त्या आवाजात आपलेपणाचा भास असतो. आपण त्याला आपल्या आयुष्याच्या कॅनव्हासवर रंगवायला लागतो पण एक दिवस लक्षात येतं ते रंग आपले नव्हतेच.

शब्दांत खरेपणाचं आश्वासन नसतं फक्त वेळ घालवण्यासाठीचे संवाद आणि रिकाम्या क्षणांची भर असते. भावनांचा खेळ मांडला जातो पण त्या खेळात आशा नसते. पण सत्य इतकं साधं असतं, जे आपलं असतं, ते स्पष्ट असतं. आणि जे आपलं नसतं, त्यांसाठी आपणच कारणं शोधत बसतो. आपल्यात काही कमी नसतं पण आपण चुकीच्या ठिकाणी उभं असतो. कोणाच्या आयुष्यात ‘भास’ होऊन जगण्यापेक्षा, स्वतःच्या आयुष्यात ‘सत्य’ होऊन जगणं अधिक महत्त्वाचं असतं. कधी कधी आठवणी आणि त्यातील वेदना तितक्या तीव्र नसतात, पण शिकवण खोल असते.

आपलेपणाचा भास आणि खरं आपलेपण यात फरक असतो. भास मोहक असतो, पण खरं नातं शांत आणि स्पष्ट असतं. ते कधीच आपली किंमत करत नसतं. कधी कधी तुटलेली नाती आपल्याला मोडत नाहीत, ती आपल्याला स्वतःकडे परत नेतात. आपण एखाद्यासाठी समुद्र व्हायला बघतो, पण समोरच्याला आपल्यासाठी साधं तळं सुद्धा होणं जमत नाही. शेवटी काय तर आपल्याला जे आवडतात त्यांना जपण्यापेक्षा आपण ज्यांना आवडतो त्यांना जपावं.

कधी कधी आपल्याला आपलंसं वाटणारं नातं फक्त भास ठरतं, आणि त्या भासातून आपल्याला स्वःताची खरी ओळख सापडते.

भास स्वतःलाच विसरायला लावतो. शब्दांत गोडवा निर्माण करतो, पण त्या गोडव्यात बांधिलकी नसते. नजरेत आपलेपण दिसतो, पण त्या नजरेत स्थैर्य नसतं. तो स्वप्न रंगवतो पण त्या स्वप्नांना अर्थ नसतो.

# नोकरीतील अलिखित नियम : “बॉस इज ऑलवेज राईट!”

## कार्यालयीन जीवनातील विनोदी आणि उपरोधिक वास्तवाचा वेध

लेखक : डॉ. दशरथ भोसले

प्रस्तावना:

कार्यालयीन व्यवस्थेत एक अलिखित नियम अनेकदा ऐकायला मिळतो — “बॉस इज ऑलवेज राईट.”

नियम, कार्यपद्धती आणि शिस्त यांच्याइतकीच मानवी स्वभावाची गुंतागुंतही कार्यालयीन जीवनात दिसून येते.

वरिष्ठ-कनिष्ठ संबंध, युनियनची मानसिकता आणि सत्तेच्या नात्यांमधून निर्माण होणारे विनोदी तसेच विसंगत प्रसंग अनेकदा घडत असतात.

कर्मचारी आणि अधिकारी यांच्या वर्तनातून व्यवस्थेचे वास्तव समोर येते.

अशाच एका कर्मचाऱ्याच्या अनुभवातून कार्यालयीन जीवनातील काही रंजक आणि उपरोधिक पैलू या कथेत उलगडतात.

विनोदी कथा:

बॉस इज ऑलवेज राईट

श्री. विनायक भडकमकर हा गेली अनेक वर्षे एमपीएससी परीक्षेत नशीब अजमावत होता. स्वप्नपूर्ती होत नव्हती. शेवटी एका शासकीय कार्यालयातील लिपीक संवर्गातील जाहिरातीसाठी अर्ज केला. लेखी परीक्षा झाली. तोंडी मुलाखत झाली. विनायकचे नशीब फळफळले. बदली होणार नव्हती आणि प्रमोशनचे चान्सेस होते. अपॉईंटमेंट ऑर्डर हातात पडताच श्री. विनायक आनंदाने नोकरीत रुजू झाला.

श्री. विनायक ज्या महाविद्यालयात शिकला तेथील प्राध्यापकांचे चांगले संस्कार त्याच्यावर झाले होते. प्राध्यापक आपल्या विषयाचे ज्ञान अपडेट करून मुलांना ते आत्मसात करायला लावायचे. त्यामुळेच विनायकने ऑफिस प्रोसीजर मॅन्युअल, सर्व्हिसेस कोड, अकाउंट कोड, सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स इत्यादी पुस्तकांचा सखोल अभ्यास सुरु केला. सुंदर अक्षर, अप टू द मार्क नोटिंग, कोठेही फापटपसारा नाही. या सर्व गुणांमुळे विनायकवर बॉसची मर्जी झाली. विनायक बॉसचा लाडका होत आहे हे पाहून साहेबांच्या पुढे लाळघोटेपणा करणारे चमचे मात्र विनायकबद्दल साहेबांचे कान भरण्याचे काम करायचे. परंतु गुणग्राहकता अंगी बाणलेल्या बॉसच्या मनात विनायकबद्दल कधीही आकस निर्माण झाला नाही.

यथावकाश विनायकचे लग्न झाले. बघता बघता सहा वर्षे झाली. विनायकला या सहा वर्षांत दोन अपत्ये झाली. नोकरीत प्रमोशनही मिळाले. साहेबांच्या शिफारशीमुळे विनायकला शासकीय वसाहतीत निवासस्थान मिळाले. विनायकच्या लक्षात आले की शासकीय निवासस्थानात राहायला फारसे कोणी राजी नसते. कारणाचा मागोवा घेतल्यावर लक्षात आले की बरेचसे कर्मचारी बँक लोन घेऊन ब्लॉक घेतात. शासकीय निवासस्थानात राहिलो तर भाडे कट होते आणि भाडे मिळत नाही. याउलट बाहेर राहिलो तर भाडे कट होत नाही. नियमाप्रमाणे चांगले हाऊस रेंट मिळते. बँक लोन परतफेडीसाठी हप्ता फेडता येतो आणि बँक लोन हप्त्याच्या परतफेडीचा इन्कम टॅक्ससाठी फायदा होतो.

विनायक सुटीच्या दिवशी युनियनच्या ऑफिसला जाऊन बसायचा. बरीचशी करमणूक व्हायची. बरेचसे कर्मचारी बॉस कसे नाहक रागावतात, कुठला तरी राग कोणावर काढतात, सुडबुद्धीने वागवतात, मेमो देतात अशा तक्रारी करायचे. मग युनियनच्या ऑफिसमधील पदाधिकारी तक्रारदार कर्मचाऱ्याचे मस्तपैकी समुपदेशन करत असत.

“हे बघा मिस्टर, आपला निम्मा पगार कामाचा असतो तर निम्मा पगार साहेबांच्या शिव्या खाण्याचा असतो.”

“साहेबांच्या रागावण्याकडे लक्ष द्यायचे नाही. एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे. डोक्यापर्यंत बॉसचे रागावणे येऊच द्यायचे नाही.”

“साहेबांनी मेमो दिला की मेमो हातात घ्यायचा आणि गाणी म्हणत ऑफिसभर फिरायचे — ‘हे मेरा प्रेमपत्र पढ़कर तुम नाराज ना होना’.”

“आपण कर्मचारी म्हणजे मेलेलं कोंबडं असतो. मेलेल्या कोंबड्याला आगीत घाला नाहीतर फुफाट्यात घाला, त्याला काय फरक पडतो का?”

एकदा तर बॉसचा राग खालपर्यंत कसा पर्क्युलेट होतो याचा किस्सा ऐकून सगळ्यांची हसून पुरेवाट झाली. अनुभवी पदाधिकारी म्हणाला —

“कर्मचाऱ्यांनो, बॉस ऑफिसात वाघ असतो; पण घरी बायकोपुढे तो शेळी असतो. बायको भांडली की साहेब ऑफिसला येतो. तो राग पी.ए. वर काढतो. पी.ए. तो राग अधीक्षकावर काढतो. अधीक्षक हेड क्लार्कवर राग काढतो. हेड क्लार्क क्लार्कवर राग काढतो. क्लार्क शिपायावर राग काढतो. शिपाई घरी जाऊन तो राग बायकोवर काढतो. बायको तो राग मुलावर काढते. मुलगा विचार करतो — माझा काही दोष नसताना आईने मला का मारले? तो रस्त्यावर येतो. समोर कुत्रा दिसतो, त्याला दगड मारतो. तेवढ्यात तिकडून साहेबांची गाडी येते. साहेब गाडीतून उतरतात आणि तो कुत्रा साहेबाला चावतो. अशा रीतीने साहेबांच्या रागाचे सर्कल पूर्ण होते.”

नोकरी करायची म्हटले तर साहेबांची मर्जी राखण्यासाठी काय काय कामे करावी लागतील ते सांगता येत नाही. विनायकच्या साहेबांना दोन मुलगे होते. ऐन तिशीत साहेबांची पत्नी वारली. साहेबांनी स्वतःचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन केले होते. नंतर साहेबांनी दुसरे लग्न केले. आपले फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन झाले आहे हे साहेबांनी आपल्या द्वितीय पत्नीपासून लपवून ठेवले. त्या स्त्रीला वाटायचे की आपल्यालाही एखादे मूल असावे. त्यामुळे ती बिचारी दिसेल त्या देवाला नवस करायची; पण शेवटी कोणताही देव तिला पावला नाही.

शेवटी तिने एक मांजर पाळले. मांजरावर तिचे जिवापाड प्रेम होते. मध्यंतरी साहेबांच्या बरोबर मॅडमनाही आठवडाभरासाठी बाहेरगावी जावे लागले. आता मांजराची जबाबदारी बाईसाहेबांनी ब्रँचच्या अधीक्षक आणि शिपायावर सोपवली. आठवडाभर दररोज अर्धा लिटर दूध मांजराला पाजण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. दररोज अर्धा लिटर दूध तापवून गार करून त्यांच्या ब्लॉकसमोरील दरवाज्यातील भांड्यात ठेवायचे. मांजर ते दूध पिऊन जिवंत राहील. साहेब यायच्या दिवशी शिपायाने साहेबांच्या दारातील भांड्यात थोडेसे दूध ओतून ठेवले. साहेब येताच मांजर येऊन मॅडमच्या जवळ गेले. मॅडमने मांजराला उचलून घेतले. मांजर बारीक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. रागाने त्यांनी अधीक्षकांना बोलावले — “तुम्ही माझ्या मांजराची काळजी घेतली नाहीत. मांजर अशक्त झाले आहे.”

आता साहेबांच्या मांजरीची काळजी घेणे कोणत्याही शासकीय नियमात लिहिले आहे का? अधीक्षकांनी साळसूदपणे सांगितले — “मॅडम, शिपाई दररोज मांजरासाठी दूध भांड्यात आणून ठेवायचा; पण मांजराला तुमचा लळा लागलेला. दाराकडे बघून तुमच्या आठवणीने म्यांव-म्यांव करत राहायची. मुका जीव, त्याला बोलता येत नाही. तुम्ही दिसत नसल्याने ते काळजीने बारीक झाले.” मॅडमना ते पटले. मांजराची तब्येत उतरली; पण फुकटचे दूध पिऊन शिपायाच्या पोराची तब्येत सुधारली हे तो अधीक्षक कोणत्या तोंडाने मॅडमना सांगणार?

श्री. विनायकच्या बॉसना शासनाने दोन आठवडे ट्रेनिंगसाठी मद्रासला पाठवले. बॉसचे दोन्ही मुलगे पुण्याला शिक्षणासाठी होस्टेलमध्ये राहत होते. बॉस दोन आठवडे ट्रेनिंगला जाणार म्हटल्यावर मॅडम एकट्या राहायला तयार नव्हत्या. बॉस बरोबर मॅडमही मद्रासला गेल्या.

एक आठवडा झाला. बॉसचा विनायकला फोन आला. “मॅडमची लहान बहीण इंग्लंडला राहते. ती येणार आहे.” तिच्या येण्याची तारीख, विमान मुंबईत पोहोचण्याची वेळ वगैरे सविस्तर माहिती दिली. गुगल पेवरून साहेबांनी खर्चासाठी वीस हजार रुपये पाठवून दिले. मेहुणीचे नाव आणि तिला ओळखण्यासाठी आवश्यक माहितीही बॉसने विनायकला दिली.

ठरलेल्या तारखेला विनायक स्वतःची कार घेऊन मुंबई एअरपोर्टवर गेला. विमान तीन तास उशिरा येणार होते. थांबण्याशिवाय पर्याय नव्हता. एकदाच विमान लँड झाल्याची घोषणा झाली. साहेबांच्या मेहुणीने कधी विनायकला पाहिले नव्हते आणि विनायकनेही तिला पाहिले नव्हते. म्हणून विनायकने दोन बोर्ड तयार करून आणले होते. दोन हातात दोन बोर्ड उंच धरून तो वाट पाहत राहिला. हात दुखायला लागले. येणारे प्रवासी बोर्ड बघून हसून निघून जायचे. एका बोर्डवर इंग्रजी मजकूर होता — “Welcome Miss Maya”, तर दुसऱ्यावर मराठीत — “मिस माया, आपले स्वागत आहे.” दोन्ही बोर्डखाली बॉसचे नाव लिहिले होते.

बरेच उशिराने मिस माया आली. मिस माया साधारण पस्तिशीची तरुणी होती. हाफ स्कर्ट, टी-शर्ट, डोळ्यावर गॉगल, रंगवलेले बॉयकट गोल्डन केस आणि लाघवी व्यक्तिमत्त्व. ओळख पटली. ती मनमोकळी हसली. विनायकच्या हातात मोठी बॅग दिली. सर्व सामान ट्रॉलीवर टाकून विनायकने ते स्वतःच्या कारपर्यंत आणले.

कार पाहताच मिस माया हिरमुसली. “मी असल्या गाडीत कशी बसू? मी जिजूला फोन करते. मला फिरायला बीएमडब्ल्यू किंवा मर्सिडीज गाडी हवी.” आपल्या कारला नावे ठेवल्याने विनायकला वाईट वाटले.

प्रवासात थोडे थांबून जेवण घ्यावे म्हणून विनायकने एका हॉटेलजवळ गाडी थांबवली. माया भडकली — “असल्या गावंढळ हॉटेलमध्ये मी जात नाही. चांगले फाईव्ह स्टार हॉटेल बघ.”

एअरपोर्टवरुन येताना मायाने दोन महागड्या स्कॉचच्या बाटल्या आणल्या होत्या. एक बाटली उघडली. विनायकसाठीही ग्लास भरला. विनायक नम्रपणे म्हणाला, “मॅडम, मी दारु पित नाही.” त्यावर माया हसली — “किती गावंढळ आहेस!”

निघताना मायाने सिगारेट शिलगावली आणि विनायककडे पाकीट केले. विनायक म्हणाला, “मी सिगारेट कधीच ओढली नाही.” त्यावर माया पुन्हा हसली.

पाच तास प्रवास करुन ते घरी आले. विनायकच्या पत्नीने दारातच मायाचे औक्षण केले. कपाळाला कुंकू लावले आणि डोक्यावर अक्षता टाकल्या. मायाचा मेकअप खराब झाला. माया रागावली — “कोणत्या जमान्यात तुम्ही इंडियन लोक वावरता? माझा कॉस्टली मेकअप खराब केलास.”

विनायकची दोन मुले उत्सुकतेने मायाकडे गेली. पण मायाने त्यांना झुरळ झटकावे तसे दूर केले. मायाच्या वागण्याने विनायकचे कुटुंब खूप दुखावले.

विनायक अजूनही विचार करत आहे — मी दारु का पित नाही? सिगारेट का ओढत नाही? त्यामुळे मायाची कंपनी मला लाभू शकली नाही. एवढी चांगली संधी हुकली.

समारोप / तात्पर्य:


कार्यालयीन व्यवस्थेत नियमांइतकेच मानवी संबंध महत्त्वाचे असतात.

कधी कधी वरिष्ठांची मर्जी राखण्याच्या प्रयत्नात कर्मचारी अनावश्यक अडचणीतही सापडतात.

स्वतःची मूल्ये, संस्कार आणि स्वाभिमान जपणे हेही तितकेच आवश्यक असते.

सर्व परिस्थितीत “बॉस नेहमीच बरोबर असतो” ही मानसिकता व्यवहारात नेहमी खरी ठरत नाही.

म्हणूनच विवेक, संयम आणि आत्मसन्मान या तीन गोष्टी कर्मचारी जीवनात तितक्याच महत्त्वाच्या ठरतात.



**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली, जि. रत्नागिरी.**

# अरे देवा, ग्राहक वंचना थांबेल तरी कधी?

## (15 मार्च:विश्व ग्राहक हक्क दिवस सप्ताह.)

_जो जन्माला आला तो झाला ग्राहकच! गुंतवणूकदार हासुद्धा ग्राहक आहे. त्याचा हक्कासाठी न्यायालयीन आव्हानात्मक लढा सुरु आहे. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा, याकरिता विविध ग्राहक संघटना लोकांना जागरूक करीत आहेत. या सर्वांसाठी 15 मार्च हा दिवस खुप महत्त्वाचा आहे. हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आपल्या अधिकारांविषयी ग्राहकांना जागृती प्रदान करणारा दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख... संपादक._

15 मार्च हा दिवस संपूर्ण जगात जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा होत असतो. ग्राहकांना सेवा पुरवताना होणाऱ्या हलगर्जीपणामुळे सन 1960 साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यास एक व्यासपीठ तयार करण्यात आले. त्यासाठी जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला युनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसारच दरवर्षी 15 मार्चला हा दिवस विश्वभरात साजरा केला जातो. ग्राहकाला अर्थव्यवस्थेचा राजा असे संबोधले जात असले, तरी त्याला मात्र बाजारपेठेत सतत अडवले, नाडवले अन् फसवलेही जातच असते. बिच्चाऱ्याची अपेक्षा तरी काय असते हो? आपण खरेदी करत असलेली वस्तू योग्य दर्जाची, योग्य गुणवत्तेची व वाजवी किमतीची असावी, एवढीच त्याची किमान अपेक्षा असते. पण त्याच्या नशिबी मात्र सतत अपेक्षाभंग आणि मनस्तापच! ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून त्याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दि.26 डिसेंबर 1986 या दिवसापासून भारत सरकारने ‘ग्राहक संरक्षण कायदा’ अंमलात आणला. परंतु केवळ कायदा करून त्यामागील उद्दिष्ट साध्य होत नसते. हा कायदाही त्याला अपवाद नाही. कायदा अस्तित्वात येऊन 36 वर्षे झालीत, पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल, तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे, तो घटक- ग्राहक आधी जागृत असायला हवा. कायद्याचे शस्त्र त्याला पेलता यायला हवे. अन्यथा निरक्षरांपुढे शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ ठेवण्यासारखाच तो प्रकार होईल.

बाजारपेठेत दूध किंवा शीतपेय एमआरपीपेक्षा अधिक किमतीने घ्यावे लागते. भाजीवाला तराजूत वजनाऐवजी दगड ठेवतो. दुधात भेसळ होते. टॅक्सीवाल्यांची लुबाडणूक आपण निमूट सहन करतो. बिल्डर, फायनान्स कंपन्या, प्रवासी कंपन्या, वस्तूंचे उत्पादक आपल्याला फसवताहेत, हे सगळे का? कारण एकच, अजूनही आपल्यातील शोषणाविरुद्ध लढणारा खरा ग्राहक बाहेर येत नाही. ग्राहकांच्या हितसंबंधाचे अनुचित प्रथांपासून संरक्षण करणे हे आज ग्राहक चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. त्यासाठी करावी लागणारी ग्राहक जागृती, वेळेप्रसंगी द्यावे लागणारे न्यायालयीन लढे हे सगळेच आव्हानात्मक आहे. कधी कधी तर ही लढाई असते एकट्याची. त्यासाठी वेळप्रसंगी ग्राहक संघटनांचीही मदत घ्यावी लागते, तर कधी ग्राहक संघटना व्यापक ग्राहकहीत लक्षात घेऊन प्रातिनिधिक लढे लढतात. परंतु त्यासाठी समाजातील प्रत्येक ग्राहकाचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती आणि चिकाटीची.

भारतासारख्या विकसनशील देशात खऱ्या अर्थाने ग्राहक संरक्षण व्हायचे असेल तर ग्राहक प्रशिक्षण, ग्राहक प्रबोधन व ग्राहक जागृती होणे अत्यावश्यक आहे. अनेकविध समस्यांच्या चक्रव्युहात सापडलेल्या ग्राहकांचे प्रश्न अनंत आहेत. कामे ठेकेदाराला सुपूर्द करून प्रश्न सुटत नसतात. संप, बंद, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको यासारख्या आंदोलनानेही प्रश्नांची स्थायी स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या आधारे काही प्रश्न सोडविता येतीलही, पण त्यालाही मर्यादा आहेतच. म्हणून आपले प्रश्न सोडविण्यास स्वतःच पुढाकार घ्यावा लागतो. स्वतःच स्वतःची शक्ती निर्माण करावी लागते अन् वाढवावीही लागते. त्याचसाठी हवे असते प्रशिक्षण, प्रबोधन व जागृती. शोषणमुक्तीचा तोच मूलाधार! ग्राहक चेतनेतून अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवता येईल आणि हेच कार्य ग्राहक पंचायत ही स्वायत्त संस्था करीत आहे. ग्राहक एवं राजा मानणारी ग्राहक पंचायत ही विचाराधिष्ठित संघटना आहे. आज अर्थव्यवस्थेचे स्वरुप वेगाने बदलत आहे. सेल, एकावर एक फ्री, लॉटरी, कन्सेशन, बक्षीस, आदींच्या रुपाने नको त्या वस्तूंची अडगळ घरात वाढत आहे. भेसळयुक्त दूध, अन्न आणि औषधेसुद्धा पोटात जावून व्यक्तीसह समाजस्वास्थ्य बिघडत आहे. म्हणूनच असे वाटते की, ग्राहकराजा गुलाम होऊन आज बाजारात उभा आहे. हे चित्र बदलून त्याला खऱ्या अर्थाने राज्याभिषेक करायचे व्रत स्वीकारले. शोषणमुक्तीसाठी पुढाकार घेऊन ग्राहक संरक्षण कायदा करण्यास शासनाला भाग पाडले. या कायद्याने त्रिसदस्यीय न्यायासन अभिप्रेत आहे. त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हे न्यायासनाचे अध्यक्ष व उर्वरित दोन व्यक्तींपैकी एक स्त्री, अर्थ, कायदा, प्रशासन, व्यापार या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात, अशी तरतूद आहे.

या 15 मार्च आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनाचे वेगळेच महत्त्व आहे. 15 मार्च 1962 साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकन संसदेपुढे केलेल्या भाषणात तेथील ग्राहकांना त्यांचे- सुरक्षितता, माहिती, निवड आणि प्रतिनिधित्व हे चार हक्क प्रदान केले. त्यानंतरच्या कालावधीत ग्राहक संस्थांच्या जागतिक संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघाशी चर्चा करून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांत मूलभूत गरजा पुरविण्याचा हक्क, तक्रार निवारण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्क आणि स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, या आणखी चार ग्राहक हक्कांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. अशाप्रकारे हे आठ ग्राहक हक्क आज जगभर मान्य झाले आहेत.

ग्राहकांना गृहीत धरु नका, तो आहे म्हणून तुमचा व्यवसाय आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वापरणाऱ्या ग्राहकांची विविध माहिती प्रचंड प्रमाणात जमा होते. ग्राहकांची खाजगी माहिती उघड करु नये. त्याचे बंधन कंपन्यांवर असावे. अवैध व्यावसायिकांवर कारवाई करावी. ग्राहक संरक्षण सुधारणा कायदा 2019मध्ये आला. त्यात ग्राहक हक्काच्या अनेक तरतुदी आहेत. जाहिरातीत खोटे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे एफडीएला अधिकार आहेत. जाहिरातीतील दावे प्रमाणित करण्याची कंपन्यांना आवश्यकता आहे. नमूद केलेली सेवा कंपन्यांना द्यावीच लागेल. गोडाऊनमध्ये होणाऱ्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्याची गरज आहे. नवीन सुधारित कायद्याची अंमलबजावणी व्हावी. केंद्राने 2019मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात सुधारणा केली. पण त्याचे नियम तयार नाहीत. तातडीने अंमलबजावणी व्हावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप नको. ग्राहकांना हक्काची जाणीव होऊन लोकशाही दिनाच्या तक्रारी वाढाव्यात. ग्राहकांच्या हक्कासाठी केंद्रात ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्रालय वेगवेगळे करावयास हवे. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कार्यालय उघडावे. राज्यात स्वतंत्र ग्राहक संरक्षण मंत्रालय स्थापन करावे. प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उघडून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यात नेमणूक करावी आणि ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीची जबाबदारी त्यांच्याकडे द्यावी. त्यामुळे ग्राहकांशी संबंधित तक्रारींना तातडीने न्याय मिळेल. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे ग्राहकांना नियमाप्रमाणे 90 दिवसांपर्यंतही न्याय मिळत नाही. निकाल लागला तरी मात्र अंमलबजावणी काही होत नाही, हा एक जटील प्रश्न आहे!

आपण ग्राहक म्हणून वावरताना खुपदा प्राप्त अधिकारांची आणि हक्कांची पायमल्ली होते. अशावेळी ठामपणे, चिकाटीने अधिकारांची अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढत आहे. मात्र या डिजिटल सेवा नीट समजून घेण्याची, त्यांचा वापर योग्यप्रकारे करण्याची आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हे दाखवून देण्याची खरी हीच वेळ आहे!

!! विश्व ग्राहक हक्कदिन सप्ताहनिमित्त समस्त बंधुभगिनींना सचेतनात्मक हार्दिक शुभेच्छा !!

**दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.**

**मु. पो. ता. जि. गडचिरोली**

**फक्त व्हॉ. नं. 9423714883.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

सबुरी'चा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते व परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी दिली.

हा कार्यक्रम श्री साईबाबा मंदिर डोंगरतुकाई परिसर, चांदापूर येथे होणार असून सर्व भाविकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक रामराव केशवराव गिते, रविंद्र (पप्पा) केशवराव गिते, भरत केशवराव गिते तसेच ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी केले आहे.

------------------------------------

## पान 4 वरुन

आरोपी जयराम चाटे याला 14 महिन्यांनंतर भावाच्या बाराव्यासाठी न्यायालयाने विशेष परवानगी दिली होती. शुक्रवारी (13 मार्च) सकाळी 11:45 वाजेच्या सुमारास 10 सशस्त्र कमांडो आणि स्थानिक पोलिसांच्या कडक बंदोबस्तात त्याला बीड कारागृहातून तांबवा गावी आणण्यात आले.

सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी मस्साजोग (हत्या प्रकरणाशी संबंधित गाव) मार्ग टाळला आणि धारूर मार्गे पर्यायी रस्त्याने त्याला नेले-आणले. सुरुवातीला सात तासांची परवानगी असली तरी, परिसरातील तणाव आणि संभाव्य धोका लक्षात घेता पोलिसांनी त्याला फक्त दोन तास (दुपारी 1:22 वाजेपर्यंत) गावात थांबू दिले आणि तात्काळ परत कारागृहात दाखल केले. या घटनेमुळे तांबवा आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. ही घटना संतोष देशमुख हत्याकांडातील गुंडगिरीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्तरावर भीतीचे वातावरण निर्माण करणारी ठरली आहे.

------------------------------------------

विशेषतः अंबाजोगाई येथील आशिया खंडातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय असलेल्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचा कायापालट करण्यासाठी 'मास्टर प्लॅन' तयार करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या विषयासाठी आमदार मुंदडा या दीर्घकाळापासून पाठपुरावा करत होत्या, ज्याला आता यश आले आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने नैसर्गिक शेती अभियानांतर्गत पुढील दोन वर्षांत 5 लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. रासायनिक खतमुक्त अन्नाची वाढती मागणी आणि जमिनीचा पोत सुधारण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरेल असे मुंदडा यांनी सांगितले.

----------------------------------------

प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

----------------------------------------

याबाबत आज दिनांक. 13 मार्च रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी, यांच्या उपस्थितीत सहा. जिल्हा. पुरवठा अधिकारी वसुधा रघाताटे, निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर, महसूल अधिकारी प्रकाश तांबड, कीर्तीमाला कुलकर्णी, चंद्रजीत सिंग, ब्रिजेश कुमार, अमित बोरसे, नीलेश नरखडे, मनोज कुमार, सारडा व पेट्रोल, डिझेल, गॅस वितरक यांची सविस्तर आढावा बैठक घेतली व पुरवठा सुरक्षितपणे चालू ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिले.

बीड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या कंपनी मार्फत घरगुती एलपीजी गॅस व वाणिज्य वापरासाठी गॅस तसेच पेट्रोल व डिझेलचा पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीमध्ये बीड जिल्ह्यात सुमारे 30 दिवस पुरेल एवढा साठा शिल्लक असून कुठल्याही प्रकारची तुटवड्याची परिस्थिती नाही. वाणिज्य वापरासाठीचा गॅस सद्यस्थितीमध्ये फक्त हॉस्पिटल व शाळेकरिता उपलब्ध आहे. पेट्रोल व डिझेलचा साठाही 10 दिवसांपेक्षा जास्त दिवस पुरेल एवढा शिल्लक आहे.

तसेच त्यांचे डेपोमध्ये 30 दिवस पुरेल एवढा साठा शिल्लक असून कुठल्याही परिस्थितीमध्ये तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाही. तसेच घरगुती गॅसची नोंदणी मागणीची मर्यादा 45 दिवस करण्यात आली आहे.पेट्रोल, डिझेल व गॅसच्या सुरळीत वितरणासाठी तसेच अवैध वापर रोखण्यासाठी पथके गठित करण्यात आली आहेत. या पथकांनी गॅस एजन्सींना वेळोवेळी भेटी द्याव्यात, ग्राहकांशी संपर्क साधावा तसेच काही अडचण आल्यास जिल्हा नियंत्रण कक्षास अवगत करावे असे निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------------------------------

गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे. वीज वितरण कंपनीने थकबाकीदारांवरच कारवाई करावी आणि नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांना त्रास देऊ नये, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकाराबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी योग्य ती दखल घेऊन पुढील काळात अशी घटना घडू नये, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

-------------------------------------------

कृषि अधिकारी वाळले मॅडम , निखिल मुंडे आणि श्री.योगेश गित्ते उपस्थित होते.

-------------------------------------------

कारखान्यासाठी निश्चितच अभिमानास्पद मानली जात आहे. संपूर्ण हंगामात ऊस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शेतकरी आणि कारखाना प्रशासन यांच्यात चांगला समन्वय राखण्यात आला. तसेच कामगारांचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि तांत्रिक व्यवस्थापन यामुळे गळीत प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडली. गळीत हंगामाच्या सांगता समारंभानिमित्त मिल पूजन करण्यात आले. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्व घटकांनी परिश्रम घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, 'येडेश्वरी साखर कारखान्याचा 2025-26 चा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण होणे ही आनंदाची बाब आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या संयुक्त परिश्रमांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे. सर्व संबंधितांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. पुढील गळीत हंगाम अधिक यशस्वी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो, असेही ते म्हणाले. दरम्यान, या यशस्वी हंगामानिमित्त ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी व कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील हंगामासाठीही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

----------------------------------------

संवर्धक,सूक्ष्म अन्नद्रव्य पाहणी केली ,या पासुन आंबा फळबाग यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले,माननीय विभागीय कृषी सहसंचालक श्री.वानखेडे सर, तालुका कृषी अधिकारी डॉ.नागरगोजे मॅडम, मंडळ कृषी अधिकारी श्री.पौळ सर, मंडळ कृषी अधिकारी श्री. सापते सर, उपकृषी अधिकारी श्री.गाडे सर, उपकृषी अधिकारी श्री. चाळक सर,सहाय्यक कृषी अधिकारी श्री.गव्हाणे सर, ,सहाय्यक कृषी अधिकारी श्री.डी.जे.पवार सर, सहाय्यक कृषी अधिकारी श्री.राठोड सर, सहाय्यक कृषी अधिकारी . सहाय्यक कृषी अधिकारी श्री कांबळे सर, सहाय्यक कृषी अधिकारी श्री.बी.ए.चाटे ,शेतकरी जगनाथ शिंदे इतर शेतकरी उपस्थित होते.

--------------------------------------

समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. केवळ आर्थिक मदत देऊन थांबण्याचा त्यांचा विचार नसून या उपक्रमात आणखी योगदान देण्याचाही त्यांचा मानस आहे. तसेच समाजातील सर्व सुजाण नागरिक, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभेच्छुकांनीही या शैक्षणिक उपक्रमाला हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

मुख्य अभियंता अतुल चव्हाण हे नेहमीच सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. विविध योजनांच्या अंमलबजावणीत ते केवळ प्रशासकीय पातळीवर काम न करता प्रत्यक्ष कृतीतून समाजाला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतात. आदर्शगाव योजनेअंतर्गत श्रमदानाचे कार्यक्रम असोत किंवा सार्वजनिक स्वच्छतेसाठी राबविण्यात आलेले उपक्रम असोत, त्यांनी स्वतः पुढाकार घेत सहभाग नोंदविला आहे. सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेसाठी त्यांनी स्वतः हातभार लावत समाजापुढे एक वेगळा आदर्श ठेवला आहे.

गेल्या वर्षीही वाढदिवसानिमित्त त्यांनी एक वेगळा आणि प्रेरणादायी संकल्प केला होता. वाढदिवसाचा होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. तसेच आपल्या मित्रपरिवार, सहकारी आणि शुभेच्छुकांना पुष्पगुच्छ किंवा भेटवस्तू देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. या आवाहनाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमातून जमा झालेला संपूर्ण निधी फुलंब्री येथील श्री संत सावता गुरुकुल विद्यालय येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी वापरण्यात आला. या निधीतून सुमारे 25 लाख रुपयांचे 29 संगणक, एक इंटरॅक्टिव्ह बोर्ड, संगणक टेबल आणि इतर आवश्यक साहित्य विद्यालयाला उपलब्ध करून देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या साधनांमुळे विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण आणि डिजिटल माध्यमातून शिकण्याची संधी उपलब्ध झाली.

या उपक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांच्या डोळ्यांत दिसणारी नवी स्वप्ने हेच या कार्याचे खरे समाधान असल्याचे अतुल चव्हाण यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील आधुनिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांच्यातील क्षमता विकसित व्हावी यासाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावर्षीही आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी समाजातील सर्वांना नम्र आवाहन केले आहे की, पुष्पगुच्छ, हार किंवा भेटवस्तू देण्याऐवजी "आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जिल्हा परिषद शाळा विकास प्रकल्पासाठी" यथाशक्ती सहकार्य करावे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतेनुसार केलेली छोटीशी मदत देखील एखाद्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासाला नवे बळ देऊ शकते. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून डॉक्टर, अभियंते, अधिकारी किंवा समाजासाठी कार्य करणारे जबाबदार नागरिक घडू शकतात, असे त्यांनी सांगितले.

समाजातील सुजाण नागरिकांनी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात एकत्र येऊन काम केल्यास ग्रामीण भागातील शाळांचे चित्र नक्कीच बदलू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आपल्या वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणांना सामाजिक कार्याशी जोडून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला आहे.

दि. 15 मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्रासाठी योगदान देण्याचा संकल्प केला आहे. या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी केले आहे.

-----------------------------------------

प्रधानमंत्री नागरी घरकुल योजनेतंर्गत 374 लाभार्थ्यांच्या घरांसाठी आलेला निधी नियमबाह्य पद्धतीने ठेकेदारांना वाटप करण्यात आला. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे. मात्र, चौकशीत नगरपंचायतीकडून सहकार्य मिळण्याऐवजी अडथळेच अधिक येत आहेत. कामांच्या मंजुऱ्या, कार्यारंभ आदेश आणि मोजमाप पुस्तिका (MB) यांसारख्या महत्त्वाच्या संचिकाच नगरपंचायत कार्यालयातून गायब असल्याचे समोर आले आहे.

बँकाही संशयाच्या फेऱ्यात

नियमानुसार म्हाडाकडून आलेला 5 कोटी 24 लाखांचा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवणे बंधनकारक होते. मात्र, हा नियम धाब्यावर बसवून ही रक्कम महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या केज शाखेत ठेवण्यात आली.

बंद खाती: 30 ठेकेदारांना 155 धनादेशांद्वारे 4 कोटी 24 लाख रुपये वाटण्यात आले. हे पैसे काढण्यासाठी ठेकेदारांनी ज्या बँकांमध्ये खाती उघडली होती, ती आता चौकशीच्या वेळी बंद असल्याचे आढळले आहे.

बँकेची टाळाटाळ: चौकशी समितीने बँकांकडे माहिती मागितली असता, ती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. यावरून बँकांचाही या घोटाळ्यात सक्रिय सहभाग असावा, असा संशय बळावला आहे.

जीएसटीचा मोठा चुना

या घोटाळ्यातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे, ठेकेदारांनी देयके घेताना ती जीएसटीसह (With GST) उचलली आहेत. मात्र, या रकमेतील जीएसटीचा हिस्सा शासनाच्या तिजोरीत जमाच करण्यात आलेला नाही. हा थेट सरकारी महसुलावर टाकलेला दरोडा असल्याचे बोलले जात आहे.

आमदार नमिता मुंदडांच्या लक्षवेधीला उत्तर

या प्रकरणाचे पडसाद राज्य विधिमंडळातही उमटले. आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या घोटाळ्यात बँकेचा सहभाग असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे आता केवळ नगरपंचायत कर्मचारीच नव्हे, तर बँक अधिकारीही कारवाईच्या कचाट्यात येण्याची शक्यता आहे.

नोटीस देऊनही ठेकेदार गप्प

नगरपंचायतीने 6 मार्च रोजी संबंधित ठेकेदारांना 48 तासांत खुलासे सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सहा दिवस उलटूनही बहुतांश ठेकेदारांनी उत्तर दिलेले नाही. यामुळे या प्रकरणातील 'खाचखळगे' अधिकच गडद होत असून, दोषींवर कठोर फौजदारी कारवाई कधी होणार, याकडे केजवासीयांचे लक्ष लागले आहे.

-----------------------------------------

महेंद्र थोरवे यांनी सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. एका खाजगी वृत्त वाहिनीला मुलाखत देताना थोरवे यांनी सुनील तटकरे यांना लक्ष्य केलं होतं.

या संदर्भात सुनील तटकरे यांनी माणगाव सत्र न्यायालयात थोरवे यांच्याविरोधात अब्रु नुकसानीचा दावा दाखल केला आहे. 65 कोटींचा दावा नुकताच दाखल झाला आहे. यात महेंद्र थोरवे यांच्यासह एक खाजगी वृत्तवाहिनी, आणि गुगल यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. काल शुक्रवारी यासंदर्भातील पहिली सुनावणी पार पडली, सर्व प्रतिवादींना न्यायालयाने समन्स बजावले आहे. सुनावणीची पुढील तारीख 24 एप्रिल ठेवण्यात आली आहे, अशी माहिती सुनील तटकरे यांचे वकील ॲड. प्रदीप पाटील यांनी सांगितले.

-----------------------------

# हॉस्टेलची केवळ 1 हजार फी बाकी राहिल्याने नववीतील विद्यार्थ्याला पाठीवर वळ उठेपर्यंत मारहाण!

## » हॉस्टेल चालक सुरेश राठोड विरुद्ध गुन्हा दाखल, गेवराई शहरातील आहिल्यानगर परिसरात असलेल्या सूर्योदय निवासी हॉस्टेलमधील प्रकार



गेवराई : हॉस्टेलची केवळ एक हजार रुपयांची थकबाकी असल्याच्या कारणावरुन नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना गेवराई शहरातील आहिल्यानगर परिसरात असलेल्या सूर्योदय निवासी वसतिगृहात घडली. ही घटना 12 मार्च रोजी रात्री सुमारे 8 वाजण्याच्या सुमारास घडली असून या प्रकरणी हॉस्टेल चालक सुरेश बाबुराव राठोड यांच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील मारफळा तांडा येथील ऊसतोड मजूर बाळू तारु जाधव यांचा मुलगा प्रविण जाधव हा गेवराई येथील सुरेश बाबुराव राठोड यांच्या सूर्योदय निवासी वसतिगृहात राहून नववीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. मागील तीन वर्षांपासून विद्यार्थ्याची वार्षिक सुमारे 40 हजार रुपये फीस भरली जात आहे. यावर्षीही 39 हजार रुपये फीस भरलेली असून केवळ 1 हजार रुपये बाकी होते.ही रक्कम वेळेत का भरली नाही, या कारणावरुन हॉस्टेल चालक सुरेश राठोड यांनी विद्यार्थ्याला हाताने व बुक्याने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीत विद्यार्थ्याच्या पाठीवर व मानेवर गंभीर वळ उठले असून घटनेमुळे संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी मुलाचे वडील बाळू तारु जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गेवराई पोलीस ठाण्यात सुरेश बाबुराव राठोड (वय 40, रा. जांभळी तांडा ता. गेवराई) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 115(2), 351(2), 351(3) तसेच जुवेनाईल जस्टिस ॲक्ट कलम 75 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार डोळस हे करीत आहेत.

# वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी युवराजची जिद्द

## गेवराई : दशक्रियाविधी दिवशी दिला दहावीचा पेपर



गेवराई : आयुष्यातील सर्वात मोठे दुःख उराशी घेऊनही शिक्षणाची वाट न सोडणाऱ्या एका मुलाची जिद्द सध्या संपूर्ण गेवराई तालुक्याला भावुक करुन गेली आहे. वडिलांच्या निधनानंतर दशक्रिया विधीचा दिवस असतानाही युवराज पाचपुते या दहावीच्या विद्यार्थ्याने डोळ्यांतील अश्रू पुसत प्रथम आपला विज्ञान भाग-2 चा पेपर दिला आणि पेपर संपल्यानंतरच जड अंतःकरणाने वडिलांच्या दशक्रिया विधीत सहभागी होत पित्याला अंतिम निरोप दिला.

युवराजचे वडील संतोष पाचपुते (वय 41) यांचा धूलिवंदनाच्या रात्री शहरात दोन कारच्या समोरासमोर झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला. बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असताना बुधवारी सकाळी साडेसात वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेने पाचपुते कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.घरात आक्रोश, नातेवाईकांची गर्दी आणि वडिलांच्या आठवणींनी भरलेले वातावरण अशा अवस्थेत युवराजसमोर आयुष्याची कठीण परीक्षा उभी राहिली होती. मात्र वडिलांनी दिलेले संस्कार आणि शिक्षणाचे महत्त्व त्याच्या मनात खोलवर रुजलेले होते. त्यामुळे दुःखाचा डोंगर उराशी ठेवत त्याने बुधवारी हिंदीचा पेपर दिला आणि सायंकाळी पित्याला मुखाग्नी दिला.दरम्यान, शुक्रवार (दि. 13 मार्च) रोजी वडिलांचा दशक्रिया विधी होता. पण त्याच दिवशी दहावीचा विज्ञान भाग-2 चा पेपर असल्याने युवराजने पुन्हा एकदा धैर्य दाखवले. सकाळी 11 ते 1 या वेळेत त्याने पेपर दिला. पेपर संपताच तो थेट विधीकडे गेला आणि जड अंतःकरणाने वडिलांच्या दशक्रिया विधीत सहभागी झाला.

एका बाजूला वडिलांच्या जाण्याचे दुःख आणि दुसऱ्या बाजूला आयुष्य घडवणारी परीक्षा या दोन्ही प्रसंगांना धैर्याने सामोरे गेलेल्या युवराजची जिद्द पाहून गेवराई तालुक्यातून हळहळ व्यक्त होत असून, अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आले आहेत. वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे, या एका निर्धाराने युवराजने दाखवलेली ही जिद्द प्रेरणादायी ठरत आहे.


# भावाच्या बाराव्याचा विधी उरकून जयराम चाटेची तुरुंगात रवानगी

- न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर सकाळी 9 ते सायंकाळी 4 पर्यंत चाटे याला तांबवा या मूळ गावी पोलिस संरक्षणात पाठवण्यात आले होते.



केज : संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे हा तब्बल चौदा महिन्यानंतर शुक्रवार दि.13 मार्च रोजी काही तासांसाठी जेलबाहेर येऊ शकला. त्याच्या भावाचे 2 मार्च रोजी निधन झाले होते, त्याच्या बाराव्याच्या विधीसाठी हजर राहण्याकरिता न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर सकाळी 9 ते सायंकाळी 4 पर्यंत चाटे याला तांबवा या मूळ गावी पोलिस संरक्षणात पाठवण्यात आले होते.

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची 9 डिसेंबर 2025 रोजी दुपारी अपहरण करून क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात गेल्या 14 महिन्यांपासून तुरुंगात असलेला आरोपी दुसऱ्याच दिवशी जयराम माणिक चाटे (वय 22) याचा भाऊ श्रीराम माणिक चाटे याचा 2 मार्च रोजी दिव्यांगत्वामुळे घरात पडून असताना मृत्यू झाला होता. या भावाच्या बाराव्याच्या विधीसाठी हजर राहण्याची परवानगी जयराम चाटे याने वकिलामार्फत मागितली होती. न्यायालयाने परवानगी दिल्याने जयराम चाटे यास पोलिस बंदोबस्तात कारागृहातून शुक्रवारी सकाळी पावणेबारा वाजेच्या सुमारास गावात आणण्यात आले. दोन तासांत घरी भावाचा बाराव्याचा विधी उरकल्यानंतर दुपारी दीड वाजेच्या दरम्यान त्याला पुन्हा पोलिस बंदोबस्तात कारागृहाकडे रवाना करण्यात आले.तत्पूर्वी, केज ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी जयराम चाटेला गावात आणण्यापूर्वी फौजदार लक्ष्मण कीर्तने, जमादार हनुमान मुंडे, फुलचंद सानप, डीएसबीचे शिवाजी कागदे, शहादेव म्हेत्रे यांच्यासह दोन अधिकारी, दहा कर्मचारी व होमगार्डचा बंदोबस्त तैनात केला होता.



हॅलो बीड
परळी संघर्षनेता
रविवार दि. 15 मार्च 2026


# जयराम चाटे येतोय, तुला कृष्णा आंधळे दाखवतो; तरुणावर सपासप वार, पुन्हा बीड हादरलं!



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील तांबवा येथे गुरुवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी जयराम चाटे याला भावाच्या बाराव्यासाठी तुरुंगातून तात्पुरती सुटका मिळाली होती. त्याच्या गावी येण्याच्या एक दिवस आधीच, त्याच्या नावाचा आणि फरार आरोपी कृष्णा आंधळेचा उल्लेख करत पाच जणांच्या टोळीने एका तरुणावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्याने पुन्हा एकदा बीडमध्ये खळबळ माजली आहे.

तांबवा येथील नरसिंग उर्फ संग्राम अभिमान चाटे (वय अंदाजे 25) हा तरुण आपला मित्र आदित्य बडे याच्यासह दुचाकीवर शेताकडे जात होता. संशयितांनी त्याचा पाठलाग केला आणि वाटेतच दुचाकी अडवली. दया चाटे, शरद चाटे, अमोल ठोंबरे, सागर चाटे आणि गोट्या भालेकर या पाच जणांनी तरुणाला घेरले.

आरोपींनी प्रथम संग्राम चाटेच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली, त्यानंतर लोखंडी रॉड आणि कत्तीने सपासप वार केले. हल्ल्यादरम्यान तो ओरडत होता, "तुमचा बाप जयराम चाटे उद्या येतोय, आमचा किंग पॅटर्न कृष्णा आंधळे 1313 तुला दाखवतो! तुला आज जिवंत सोडणार नाही!" असे धमकीपूर्ण उद्गार काढले. या हल्ल्यात संग्राम चाटे गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात पाचही संशयितांविरुद्ध खुनाचा प्रयत्न (कलम 109) आणि इतर संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.संतोष देशमुख हत्याकांडातील पान 3 वर

# अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयाचा होणार कायापालट

## ● जनकल्याणकारी योजनांचे आ. नमिता मुंदडांनी केले स्वागत



अंबाजोगाई : विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी मंगळवारी (दि.10) बीड जिल्ह्याच्या विकासासह शेतकरी, युवक आणि वंचितांसाठी जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांचे जोरदार समर्थन केले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंतीचे औचित्य साधून राज्य सरकारने आगामी वर्ष 'सामाजिक समता वर्ष' म्हणून साजरे करण्याचा जो ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, त्याचे आमदार मुंदडा यांनी स्वागत केले.

अर्थसंकल्पात बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या असून जिल्ह्याचा 'आकांक्षित जिल्हा' योजनेत समावेश करण्यात आला आहे. यामुळे शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून अतिरिक्त निधी उपलब्ध होणार असून जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळणार आहे. पान 3 वर

# आज ठळक

## आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात सुनील तटकरे यांचा अब्रु नुकसानीचा दावा



अलिबाग – रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी कर्जतचे शिवसेना आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात अब्रु नुकसानीचा दावा दाखल केला आहे. माणगाव सत्र न्यायालयात हा दावा दाखल करण्यात आला आहे. मंगेश काळोखे हत्या प्रकरणात थोरवे यांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हा दावा करण्यात आला आहे.

खोपोली नगर पालिका निवडणुकीनंतर शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती शिवसैनिक मंगेश काळोखे यांची 26 डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. त्यानंतर शिवसेनेचे आमदार पान 3 वर

# 16 वर्षीय मुलीवर दोघांकडून पाशवी अत्याचार; आरोपींविरुद्ध 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल



परळी वैजनाथ : परळी तालुक्यात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. तालुक्यातील धारावती तांडा परिसरात एका 16 वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी पाशवी अत्याचार केल्याची घटना घडली असून, या घटनेने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी पीडित मुलीला एका बहाण्याने घरात बोलावून घेतले. मुलगी घरात येताच नराधमांनी दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर दोघांनी तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला. इतकेच नव्हे तर, ही घटना कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही त्यांनी पीडितेला दिली.

घटनेनंतर पीडितेने धीर एकवटून आपल्या पालकांना घडलेला सर्व प्रकार सांगितला. पालकांनी तत्काळ परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, नराधमांना कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. परळी ग्रामीण पोलीस या पान 3 वर

# बीड जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा; अफवांवर विश्वास ठेवू नका

**जिल्हा प्रशासनाची माहिती; घाबरण्याचे कारण नाही**

बीड : बीड जिल्ह्यात आगामी तीस दिवस पुरेल एवढा गॅस साठा आहे. याबरोबरच पेट्रोल आणि डिझेलचाही साठा पुढील दहा दिवस पुरेल एवढा असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. याबाबतचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत शुक्रवार, 13 मार्च रोजी घेतला.

आखाती युध्द परिस्थिती लक्षात घेता इंधनाबाबत तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासनाकडून योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये तुटवड्याचे कारण सांगून ग्राहकाकडून अतिरिक्त पैसे घेणे, टंचाईच्या भितीमुळे गॅसचा साठा करुन ठेवणे, घरगुती गॅसचा वापर वाणिज्यीक कारणासाठी करणे, गाहकांच्या मागणीनंतर पुरवठा उशिरा करणे अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. पान 3 वर

# गाढे पिंपळगावात विज वितरण कंपनीचा सावळा गोंधळ; वसुलीसाठी दिवसभर वीजपुरवठा बंद, गावकऱ्यांचा संताप

परळी वैजनाथ दि.14(प्रतिनिधी) तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे विज वितरण कंपनीने थकबाकी वसुलीसाठी संपूर्ण गावाचा दिवसभर वीजपुरवठा बंद केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. ज्यांनी नियमितपणे विज बिल भरले आहे त्यांनाही दिवसभर अंधारात बसावे लागल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील काही ग्राहकांकडे वीज बिलाची थकबाकी असली तरी त्यासाठी संपूर्ण गावाचा वीजपुरवठा बंद करणे अन्यायकारक आहे. ज्यांची थकबाकी आहे त्यांच्या कनेक्शनवरच कारवाई करावी, असा ग्रामस्थांचा आग्रह आहे. वीजपुरवठा दिवसभर खंडित राहिल्यामुळे घरगुती कामे, शेतातील मोटारी, तसेच लहान व्यावसायिकांचे कामकाज ठप्प झाले. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात वीज नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला."आधीच गावाला कमी वेळ वीज मिळते, त्यातही अशा पद्धतीने संपूर्ण गावाचा पुरवठा बंद केल्यास वसुली कशी होणार?" असा सवाल पान 3 वर

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान धर्मापुरी तालुका परळी वैद्यनाथ जिल्हा बीड येथे संपन्न



परळी वैजनाथ दि.14(प्रतिनिधी) मौजे धर्मापुरी तालुका परळी जिल्हा बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान आयोजित करण्यात आले यावेळी कृषी विभागाच्या वतीने mahadbt व नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-2 याबाबत धर्मापुरी मंडळातील शेतकऱ्यांना मा.आमदार धनंजयजी मुंडे साहेब, अपर जिल्हाधिकारी आश्विनी जिरंगे मॅडम,उपविभागीय दंडाधिकारी अरविंद लाटकर साहेब तहसीलदार तरंगे साहेब, राजवर्धन भोसले गटविकास अधिकारी यांचे उपस्थितीत पूर्व समती पत्राचे वाटप करण्यात आले तसेच तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांनी सर्व उपस्थित शेतकऱ्यांना पीएम किसान ,PMFME योजना ,महाविस्तार Ai App बद्दल महत्व तसेच पोकरा प्रकल्पाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना व कृषि विभागाच्या इतर योजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले व कृषि विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या मोबाईल मध्ये महाविस्तार ए आय ॲप प्रत्यक्ष डाउनलोड करुन दिले व पीएमकिसान योजनेच्या अडचणी तिथेच सोडविण्यात आल्या.यावेळी मंडळ कृषी अधिकारी श्री.प्रताप मुंडे उपकृषी अधिकारी श्री. मनोज वाकळे श्रीमती सहायक पान 3 वर

परळी संघर्षनेता
प्रतिनिधी नेमणे आहे
बीड,आष्टी,पाटोदा,गेवराई अंबाजोगाई,केज,वडवणी, सिरसाळा,धर्मापुरी
या तालुक्यात व गावात लोकप्रिय परळी संघर्षनेता या वर्तमान पत्रा करिता अनुभवी प्रतिनिधी नेमणे आहे.
-:त्वरित संपर्क करा:-
9881265102

# येडेश्वरीचे सर्वाधिक गाळप; कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या संपन्न

## ● 9.22 लाख मेट्रिक टन ऊस गाळप; खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकरी-कामगारांचे केले कौतूक



केज/प्रतिनिधी: तालुक्यातील आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना लि. (युनिट क्र.1) चा सन 2025-26 चा गळीत हंगाम मिल पूजन करून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे यंदाचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाचे गाळप येडेश्वरी कारखान्याने केले आहे.


कारखान्याकडून यंदाच्या हंगामात एकूण 9,22,116.379 मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले असून, ही कामगिरी पान 3 वर

# कृषी सहसंचालक वानखेडे तालुका कृषी अधिकारी नागरगोजे मॅडम यांची शेतकरी शिवाजीराव देशमुख व इतर शेतीवर प्रत्यक्ष भेट



विभागीय कृषी सहसंचालक श्री .वानखेडे साहेब यांनी आज दिनांक 5/02/2026 रोजी मौजे देशमुख टाकळी येथील शेतकरी श्री.शिवाजी बाबुराव देशमुख यांच्या शेतामध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना अंतर्गत केशर आंबा फळबाग लागवड पाहणी केली ,व शेतकऱ्याला आंबा फळपिकाचीयोग्य नियोजन व खत व्यवस्थापन, काढणी पश्चात प्रक्रिया (Post-Harvest Processing) प्रामुख्याने सुरक्षित पक्वता (Ripening), प्रतवारी (Sorting), स्वच्छता, पॅकिंग आणि प्रक्रियेद्वारे मूल्यवर्धन (Value Addition सावलीत काढून कसे करावे या करण्यसाठी मार्गदर्शन केले व सेंद्रिय पद्धतीने खते, जिवाणू पान 3 वर

# रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची मुंबईत भेट; पुरुषोत्तम (गोटू )वीर यांना लवकरच मोठी जबाबदारी?



मुंबई (प्रतिनिधी) – राजगृहाशी एकनिष्ठ राहून सामाजिक व राजकीय कार्यात सक्रिय असलेले पुरुषोत्तम (गोटू )वीर यांनी आज मुंबई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात येथे रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान पक्षाचे नेते विजय साळवे यांच्या उपस्थितीत पक्ष संघटन अधिक मजबूत करणे, पक्षाचा विस्तार वाढवणे तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका ताकदीने लढवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी पक्षाच्या पुढील वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर सकारात्मक संवाद झाला. तसेच पुरुषोत्तम वीर यांना लवकरच रिपब्लिकन सेनेत महत्त्वाची जबाबदारी देण्यात येणार असल्याची चर्चा देखील या बैठकीत झाली.या प्रसंगी लक्ष्मण गव्हाणे, अशोक वाघमारे, बी. एस. जगतकर यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणासाठी योगदान

## ● विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांचा प्रेरणादायी उपक्रम



परळी वैजनाथ / महादेव गित्ते (प्रतिनिधी): "कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात स्वतःपासून करावी" या विचाराला कृतीत उतरवत सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची भावना जपत त्यांनी यंदाच्या वाढदिवसानिमित्त "आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जिल्हा परिषद शाळा विकास प्रकल्पा" साठी ₹99,999/- इतकी मदत जाहीर केली आहे.

विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाला त्यांनी स्वतःपासून सुरुवात करून पान 3 वर

# केज नगरपंचायत घरकुल घोटाळा: बँक खाती 'गायब', जीएसटीचा भरणाच नाही; चौकशीत धक्कादायक 'गौडबंगाल' समोर

**बँकेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह!**




प्रकाश मुंडे /केज तालुका प्रतिनिधी केज नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री नागरी घरकुल योजनेत झालेला कोट्यवधींचा घोटाळा आता एका नव्या वळणावर येऊन ठेपला आहे. लाभार्थ्यांच्या हक्काचे पैसे ठेकेदार आणि कर्मचाऱ्यांच्या खिशात घालताना सर्व नियम पायदळी तुडवण्यात आलेच, पण आता चौकशी दरम्यान संबंधित बँक खातीच बंद असल्याचे समोर आल्याने खळबळ माजली आहे. विशेष म्हणजे, देयके जीएसटीसह उचलली असतानाही शासनाकडे जीएसटीचा एक रुपयाही भरला नसल्याचे उघड झाले असून, यात बँकेचाही सहभाग असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

काय आहे नेमकं प्रकरण? पान 3 वर